Estd : 1962

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ५६ वा वार्षिक पदवी प्रदान समारंभ

गुरुवार, दि. ०६ फेब्रुवारी, २०२०

## मा. प्रा. भूषण पटवर्धन,

**पीएच.डी., एफ.एन.एएस्सी., एफएनएएमएस.,**

**उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग**

भारतीय उच्च शिक्षणाचा पुन:र्विचार गौरवशाली भूतकाळाकडून उज्ज्वल भविष्याकडे जाण्यासाठी मार्ग कसा तयार होवू शकेल.

**''आम्हाला असे शिक्षण हवे आहे ज्या शिक्षणाद्वारे उत्तम चारित्र निर्माण होईल, मनोबल उंचावेल, बौध्दिक विकास होईल आणि ज्यामुळे आपण स्वत:च्या पायावर उभे राहू शकू'' – स्वामी विवेकानंद.**

आदरणीय कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी, कुलगुरु प्रा. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु, प्रा. दिगंबर शिर्के, कुलसचिव, प्रा. विलास नांदवडेकर, व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, अधिसभा व परीक्षा व मूल्यमापन मंडळ सदस्य, विविध शाखेचे अधिष्ठाता, शिक्षक, विद्याशाखा सदस्य, विद्यार्थी, पालक व बंधू भगिनीनो.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या ५६ व्या दीक्षांत समारंभात सहभागी होताना मला विशेष सन्मान व अभिमान वाटत आहे. सर्व प्रथम आपले विद्यापीठ ज्यांच्या नावाने ओळखलं जातं अशा आपल्या थोर प्रेरणास्त्रोताला छत्रपती शिवाजी महाराजांना मी आदरयुक्त अभिवादन करतो. स्वर्गिय श्री. यशवंतराव चव्हाण आणि श्री. बाळासाहेब देसाई यांच्या पुढाकारामुळे हे विद्यापीठ स्थापन झाले. त्यांच्या दूरदृष्टिचा आपण सर्वांनी आदर करायला हवा. महालक्ष्मीच्या आशिर्वादाने पावन झालेले कोल्हापूर शहर आपल्या सांस्कृतिक, शैक्षणिक, कला-हस्तकला आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीसाठी प्रसिध्द आहे. स्थापनेपासून शिवाजी विद्यापीठ प्रादेशिक व देशाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच न्याय्य व सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी वचनबध्द आहे. हे पुरोगामी विद्यापीठ, संशोधन, विस्तार, कृती उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक गरजा पूर्ण करत उत्कृष्ट गुणवत्तेच्या शिक्षणाची संस्कृती वाढविण्यासाठी समर्पित आहे. वाढत्या गरजांची पूर्तता करु शकणाऱ्या नि:स्वार्थ व विद्यार्थ्यांचा स्वावलंबी

समाज घडविण्यासाठी विद्यापीठ मूल्याधिष्ठीत उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी विनातडजोड अविरत कार्यरत आहे. शिवाजी विद्यापीठ यापूर्वी काही खडतर काळातून गेले आहे. तथापि, नव्या उमेदीने काळानुरुप शिक्षण आणि संशोधनाची गुणवत्ता सुधारुन दैदिप्यमान यश संपादित केले आहे. या संदर्भात माजी कुलगुरुंचे योगदान स्मरते. विशेषत: कै. प्रा. के. बी. पवार, कै. प्रा. डी. एन. धनागरे, प्रा. एम. जी. ताकवले, प्रा. एम. एम. साळुंखे, प्रा. एन. जे. पवार यांना मी व्यक्तीश: ओळखतो.

शिवाजी विद्यापीठाकडे असलेली ९०० एकर जमीन ही जैवविविधतेने संपन्न आहे. विद्यापीठ परिसरात तीन सरोवरे आहेत. असे वातावरण विद्यार्थ्यांच्या शाश्वत विकासासाठी, शैक्षणिक व नेतृत्व गुण संपादन करण्यासाठी उत्तम उर्जास्त्रोत ठरु शकते. या विद्यापीठ क्षेत्रातील युवा सहभाग हा विधायक कार्यासाठीचे एक पाऊल असून तो भविष्यकाळात जागतिक विचारांना चालना देणारा असेल. विद्यापीठाचे सर्व समावेशक धोरण उल्लेखनीय असून जिथे ग्रामीण व कृषि पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी या विद्यापीठात येतात. भारतीय व परदेशी भाषांमधील सक्रीय मानव्यविद्या शाखा ही विद्यापीठाची शक्तीस्थाने आहेत. त्यामुळे मराठी माध्यमातील विविध विद्याशाखांमध्ये जागतिक दर्जाची बौध्दिक प्रगती होण्यास मदत होईल. विज्ञान तंत्रज्ञान, सामाजिक विज्ञान आणि मानव्यविद्या या विषयामधील दर्जेदार शिक्षण, संशोधन, विविध उपक्रम व कौशल्य यांच्यात उत्तम संतूलन साधून शिवाजी विद्यापीठ एक आश्वासक संस्था म्हणून उदयास आली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे आजपर्यंतचे सर्व कुलगुरू, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्रशासकीय अधिकारी व सेवक यांनी समर्पित भावनेने दिलेल्या योगदानामुळे नॅकच्या तिसऱ्या पर्वात विद्यापीठास ''ए'' मूल्यांकन प्राप्त झाले आहे. मला आशा आहे की, शिवाजी विद्यापीठाचा ५८ वर्षाचा वारसा भारतीय शिक्षण प्रणालीच्या परिवर्तनाच्या टप्प्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. या दीक्षांत अभिभाषणात भारतीय शैक्षणिक प्रणालीचा पुर्नविचार करण्याची गरज असल्याचे मी सांगू इच्छितो, आणि गौरवशाली भूतकाळाचे धडे आपणास उज्ज्वल भविष्याच्या दिशेने जाण्यासाठी कशी मदत करु शकतील याबद्दल माझे मत व्यक्त करतो.

**नवीन भारतासाठी शिक्षण :**

**'विद्यापीठ जे काही शिक्षण प्रदान करते त्या माध्यमातून आपण रहात असलेल्या वैश्विक खेडयाची विशालता आणि विविधता लक्षात घेवून जागतिक स्तरावर स्वत:चे स्थान साध्य केले पाहिजे' - पंतप्रधान नरेंद्र मोदी**

संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये स्वीकारलेले चिरंतन विकास ध्येय (Sustainable Develpment Goal-SDG) SDG-4 शिक्षणासाठी समर्पित आहे. याचा उद्देश सर्व महिला व पुरुषांना परवडणारे आणि दर्जेदार विद्यापीठीय तांत्रिक, व्यावसायिक आणि इतर शिक्षणाचे समान प्रवेश निश्चित करणे आहे. दर्जेदार शिक्षण, लोकांना समाजातील जबाबदार घटक म्हणून त्यांची क्षमता वृध्दिंगत करण्यास सक्षम बनवते. दर्जेदार शिक्षण केवळ तथ्य शिकविण्यासाठी नाही तर त्या सत्यता कशा सुनिश्चित कराव्यात याबद्दलचे ज्ञान वाढविण्याविषयी देखील आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणामध्ये चिकित्सक विचारसरणी आणि विविध शाखांमधील स्वंतत्र व एकाधिक शिक्षण यांचा समावेश होतो. गांधीजींची १५० वी जन्मशताब्दी साजरी करत असताना मला त्यांच्या ''बुनियादी शिक्षण'' प्रणालीविषयीचे विचार आजच्या काळात अधिक समर्पक वाटतात.

या घडामोडीच्या अनुषंगाने आणि नवीन भारताच्या आकांक्षा लक्षात घेवून निती आयोग शिक्षण क्षेत्राच्या दृष्टिकोन, कार्यनिती व कृती कार्यसुचीसाठी १५ वर्षाचा आराखडा घेवून पुढे आला आहे. २०१८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) १० अनुलंब बनलेले गुणवत्ता आदेश जाहीर केले. त्यानंतर मानव संसाधन विकास मंत्रालयाने (MHRD) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा (National Educational Policy-NEP) मसुदा तयार करण्यासाठी डॉ.के कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. NEP2019 च्या मसुद्यात एक भारत-केंद्रीत शिक्षण प्रणालीची कल्पना केली ज्यामध्ये, आपल्या देशाला समतोल पध्दतीचे उच्च दर्जाचे शिक्षण देवून शाश्वत व दोलायमान ज्ञानाच्या समाजात कायम स्वरुपी रुपांतरीत करण्यास हातभार लावते. हे धोरण नि:पक्षपातीपणा, गुणवत्ता, नाविण्य आणि उत्कृष्टतेच्या तत्त्वांवर आधारीत आहे. या नियामक चौकटीत सुशासन आर्थिक स्थिरता, सुरक्षा, शैक्षणिक उद्दिष्टे व पारदर्शकता जाहीर करुन शिक्षणाचे व्यापारीकरण दूर करुन खाजगी प्रयत्नांना नफा न होवू देता प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. मसुद्याच्या अनेक गोष्टीमध्ये NEP सशक्तपणे विद्यार्थी केंद्रित प्रणाली, लवचिकता उदारमतवादी शिक्षण एकाधिक प्रवेश, एकार्थिक निर्गमन पर्याय, बहुआयामी दृष्टिकोनातून संकल्पनाची समज, सृजनशीलता समालोचन, मूल्ये, नीतिशास्त्र, जीवनकौशल्य, न्याय व समावेशन, संस्था-स्वायतता, सशक्तीकरण, विद्याशाखा विकास आणि संशोधन संस्कृती बळकट करणे याचा पुरस्कार करते. खरोखरच NEP हा एक दूरदर्शी आणि सुयोग्यवेळी राबविलेला प्रयत्न आहे. ज्यामुळे भारतीय शिक्षण प्रणालीचे मुलभूत गुण पुन्हा नव्याने विचार करण्यास व सुधारण्यास मदत होईल.

दूरदर्शी नेतृत्व असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतील नवीन भारताचे लक्ष शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा व सर्व समावेशकता यावर आधारीत आहे. या वर्षाच्या सुरुवातीस MHRD शैक्षणिक गुणवत्ता श्रेणी सुधारणा आणि समावेशन प्रकल्प (Education Quality Upgradation and Inclusion Project) (EQIP) साठी शिकणे-शिकवणे उत्कृष्टतेसाठी एक धोरणात्मक ५ वर्षाचा कृती आराखडा तयार केला आहे. अशाच उद्देशांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने गुणवत्ता, प्रवेश समानतेला प्रोत्साहन देण्यासह उच्च शिक्षणात गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पाउले उचलली आहेत. युजीसीच्या गुणवत्ता मंडळाच्या दहा अनुलंबात पुढील गोष्टी समाविष्ट आहेत. विद्यार्थी उद्बोधन शिबिर, शिक्षण परिणाम आधारीत अभ्यासक्रम, शिक्षण प्रक्रियेत आयसीटीचा वापर, जीवन कौशल्य, सामाजिक व उद्योग एकत्रीकरण, मूल्यांकन सुधारणा, करिअर प्रगती, माजी विद्यार्थी संघ, विद्याशाखा विकास, मान्यता प्रक्रिया बळकट करणे आणि संशोधन व नाविण्यास प्रोत्साहित करणे.

या व्यतिरिक्त एकाधिक प्रवेश, एकाधिक निर्गमन यंत्रणेसह उदारमतवादी शिक्षणाच्या NEP च्या पुनर्रचनेच्या अनुषंगाने युजीसी विद्यार्थी केंद्रित लवचिक बहुअनुशासनात्मक शैक्षणिक प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न करीत आहे. नॅशनल अॅकॅडेमिक क्रेडिट बँक (NAC Bank) आणि सेमिस्टर आउटरीच प्रोग्राम (SOP) अशी काही मोजकी पाउले या दिशेने उचलली गेली आहेत. शिक्षक व विद्यार्थ्यांद्वारे दर्जेदार संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी स्कीम फॅार ट्रान्सडिसिप्लीनरी रिसर्च फॉर इंडियाज डेव्हलपिंग इकॅानॉमी (STRIDE) सारखी नवीन योजना जाहीर केली आहे. युजीसीने गुणवत्ता प्राप्त नियतकालिकांची संदर्भ यादी ओळखण्यासाठी सतत देखरेखीसाठी (CARE) (Consortium for Academic & Research Ethics) शैक्षणिक व संशोधन

नीतीशास्त्र संघाची स्थापना केली आहे. अशी आशा आहे की, गुणवत्तापूर्ण भारतीय उच्च शिक्षण प्रणालीतील शैक्षणिक, संशोधन, तांत्रिक व नियामक वातावरण सुधारण्यास ही योजना मदत करेल.

**शैक्षणिक क्रांती**

ऐतिहासिकदृष्टया, विशेषत: वैदिक कालखंडात, भारतीय शिक्षण गुरुकुल आणि आश्रम प्रणालीवर आधारीत होते. भारतीय ज्ञान आणि शिक्षणाचा तात्विक पाया हा सांख्य, न्याय, योग आणि विशेषिका या सारख्या दर्शनाचा समावेश करण्याऱ्या काही प्रबळ वैचारिक सांप्रदायावर आधारीत आहे. त्या काळी गुरु आणि शिष्य यांच्यातील संबंध पूर्णत: वेगळया स्वरुपाचे होते. आश्रम जीवन निवासी प्रकारचे, कठोर परिश्रमाचे, सैन्य शिस्तीचे आणि अत्यंत शिस्तबध्द होते. सर्वसाधारणपणे, इ.स. पू. ६०० च्या कालखंडामध्ये आश्रम शिक्षण पध्दतीतून तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला या सारखी अनेक बहुउद्देशिय विद्यापीठे विकसित झाली. जवळपास बाराव्या शतकापर्यत भारताने शैक्षणिक भरभराटीचा सुवर्णकाळ अनुभवला. कारण याच काळात तत्वज्ञान, व्याकरण, आयुर्वेद, कृषि, शस्त्रक्रिया, राजकारण, तिरंदाजी, युध्द, खगोलशास्त्र, अर्थशास्त्र, व्यापारशास्त्र, संगीत, नृत्य इ.शाखांमध्ये नैपुण्य मिळविण्यासाठी ही विद्यापीठे जगातील विविध भागातील विद्यार्थ्यांना आकर्षित करीत होती. ही भारतीय शिक्षण प्रणालीतील पायाभूत (0.0 शिक्षण पध्दती) मानली जाते. तथापि, यातील बहुतेक विद्यापीठे विविध आक्रमणकर्त्यांनी नष्ट केली.

वसाहत काळात ब्रिटीश राज्यकर्त्यांनी स्थानिक संस्कृतीची ओळख मिटविण्यासाठी आणि त्यांच्यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ विकसित करण्यासाठी त्यांनी काही विद्यापीठे सुरु केली. ही मॅकॉलिझमची सुरुवात होती. याच कालखंडामध्ये भारतामध्ये 'गुरुकुल' ते 'कुलगुरु' यापध्दतीचे संक्रमण झाले. पारंपारिक गुरुकुल प्रणालीत गुरु (शिक्षक) आणि शिष्य (विद्यार्थी) यांच्यात जवळचा आणि महत्त्वपूर्ण संवाद होत असे. विद्यार्थ्यांसाठी शिक्षक एक आदर्श होता आणि शिक्षकाचे गुण, शिक्षकांची शैली आणि अनुभव आत्मसात करण्याची अनोखी संधी त्यांना मिळत असे. वैदिक शिक्षण प्रणालीमध्ये शिक्षकापासून ते गुरु पर्यतच्या प्रगतीचे सखोल वर्णन केलेले आहे. केवळ माहिती देणारा शिक्षक म्हणजे 'अध्यापक' जो माहितीसह एकत्रित ज्ञान देतो तो 'उपाध्याय' आणि जो कौशल्य देखील प्रदान करतो तो म्हणजे 'आचार्य' होय. जो विशिष्ट विषयात खोलवर अंर्तदृष्टी देण्यास सक्षम आहे तो 'पंडित' व जो दूरदृष्टिचे विचार मांडतो, टिकेला आणि विचारांना प्रोत्साहन देतो तो 'द्रष्टा' आणि 'गुरु' हा उच्च स्तराचा शिक्षक जो शहाणपण (सदसद्‌विवेकबुध्दी) जागृत करण्यास सक्षम आहे आणि अंधारापासून प्रकाशाकडे मार्ग दाखवतो. गुरुकुल पध्दतीत विद्यार्थ्यांची सुप्त क्षमता संभावतेची आणि व्यक्तिमत्व विकासाशी संबंधित होती. सदर प्रक्रिया जीवशास्त्र विकासाच्या प्रक्रियेच्या रुपात मानली गेली. ती केवळ यांत्रिक शिक्षण पध्दतीवर कार्यरत नव्हती.

मेकॉलेने ओळखले की, भारतीय पारंपारिक शिक्षण प्रणाली ही भारतीयांच्या परंपरा, संस्कृती आणि संस्काराशी संलग्न असण्यास जबाबदार आहे. इंग्रजी भाषेचे वर्चस्व असलेली शिक्षण प्रणाली सुरु करण्याच्या धोरणाची त्यांनी शिफारस केली याचा परिणाम म्हणजे संस्कृत आणि प्रादेशिक भाषांचे अधिग्रहण झाले आणि कुलगरुंच्या नेतृत्वात ब्रिटीश शिक्षण प्रणाली असलेल्या विद्यापीठांची स्थापना झाली. हा टप्पा शिक्षण १.० (E-१) म्हणून मानला जावू शकतो. सद्याची कुलगुरु पध्दती ही पद आणि प्रतिष्ठेला अधिक केंद्रीत करणारी

असून ती प्रत्यक्ष शिक्षण आणि व्यक्तिमत्व विकासाला केंद्रीभूत म्हणजेच सुवर्णप्रमाण मानण्यापेक्षा नियम, बंदिस्तता आणि पाठांतराला शिक्षणाचे प्रमाण मानणारी आहे. इमारती, विभाग आणि प्रयोगशाळा ह्या अधिक प्रमाणात व्यावसायिक परिपूर्णतेसाठी असून त्या प्रत्यक्ष वापरासाठी अपूऱ्या आहेत. सद्याच्या पारंपारिक शिक्षण पध्दतीमध्ये पूर्वकालीन शिस्त व वैज्ञानिक शोध भावना यांचा अभाव जाणवत आहे. १८ व्या शतकात E-१ शिक्षण प्रणाली प्रबळ होती. ही शिक्षण प्रणाली एकतर्फी असून यामध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना प्रामुख्याने पाठयपुस्तके, नोटस आणि अलिकडील काळात म्हणाल तर पॉवर पॉईट प्रेझेंटेशन, व्हिडिओ आणि इंटरनेट स्त्रोतांद्वारे माहिती देवून विद्यार्थ्यांना शिकवतात. सामान्यत: विद्यार्थ्यांना रिकाम्या पेटया मानले जावून शिक्षकांना अभ्यासक्रमाच्या आधारे माहिती पुरविण्यास अधिकृत केले जाते. इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकाच्या आगमनापर्यत कित्येक दशके (E १.०) ही प्रणाली प्रबळ राहिली. यापुढे आपण १९ व्या शतकात शिक्षण २.० (E २.०) ही प्रणाली पाहिली. ज्यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी, विद्यार्थी आणि विद्यार्थी व विद्यार्थी आणि इतर तज्ञ यामधील संवादावर भर दिला गेला. शिक्षण ३.० (E ३.०) ही प्रणाली सहयोगी शिक्षण, व्हिडिओ कॉन्फरसिंग, स्काईप, विकी, ब्लॉग आणि वर्गातील इतर सोशल नेटवर्किग व मूडल, मूक्स यासारख्या शिक्षण व्यवस्थापन प्रणालीवर आधारीत आहेत. सद्या आपण E ३ वरुन E ४ कडे जात आहोत ज्यामध्ये खाजगीकरण, व्यापारीकरण आणि तंत्रज्ञान यासारखे प्रमुख घटक समाविष्ट आहेत.

### भविष्यकालीन शिक्षण

**''माझे हे ठाम मत आहे की, पुढील पिढीमध्ये दिले जाणारे बहुतांशी शिक्षण पुस्तकामधून न दिले जाता ते चलतचित्रांद्वारे दिले जाईल.'' – थॉमस एडिसन १९२३**

भविष्यातील शिक्षणामध्ये पारंपारिक शिक्षण प्रणालीस छेद दिला जावून तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल व त्याद्वारे विविध शैक्षणिक सामुग्री विनासायास उपलब्ध होईल. भविष्यातील शिक्षण हे तंत्रज्ञानावर भर देणारे सहयोगी व परस्पर विरोधी सांस्कृतिक विचारांची देवाण घेवाण करणारे तसेच परस्पर विरोधी संस्थात्मक विचारांचे पुरस्कार करणारे असेल. ज्यामध्ये अभ्यासक विद्यार्थी हा स्वत: ज्ञानाचा निर्माता असेल जो शिक्षकांची ज्ञानावर असणारी मक्तेदारी मोडून काढण्यासाठी नवे आव्हान उभे करेल. अगदी नजीकच्या काळामध्ये बुध्दीमत्ता, यांत्रिक शिक्षण, सखोल अभ्यास, यंत्रमानव व संदेशवहन शास्त्र ३ चा वापर शिक्षणातील अभ्यासक्रमामध्ये त्याचा प्रचार व प्रसारामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. हे शिक्षण प्रामुख्याने स्वयंनिर्देशित, स्वयंप्रगतीवर आधारीत असेल की जे शिक्षणामध्ये अभिरुची निर्माण करेल व त्यामध्ये समस्या निवारण, नाविन्यता आणि सर्जनशिलता या सारख्या घटकांची चालना मिळून खरे शिक्षण अध्ययन घडून येईल असा कयास आहे. (E ५) ही शिक्षण पध्दती केवळ माहितीचा किंवा ज्ञानाचा साठा असणारे अभ्यासक निर्माण करणारी नसावी. तर कार्यक्षमतेवर आधारीत असावी. तसेच ती भविष्यातील मागणी ओळखून तसा पुरवठा करणारी असावी की, ज्याद्वारे भविष्यातील अभ्यासक हे विविध कौशल्ये आत्मसात करतील व आधुनिक तंत्रज्ञान अवगत करतील. (E ५) ही शिक्षण पध्दती लवचिक नियमनकारक तसेच आजीवन असेल ज्यामध्ये अभ्यासकाला भावनिक बुदध्यांकाला त्यांच्या बौध्दिक बुदध्यांकापेक्षा अधिक महत्त्व असेल. भविष्यकालीन शिक्षण हे औद्योगिक आर्थिक विकासास सहाय करणारे असावे. तसेच व्यक्ती व यंत्राचे अभिसरण होवून Cobots म्हणजेच आधुनिक यंत्रमानव निर्माण करुन नव्या शिक्षण पध्दती निर्माण करणारे

असावे. E ५ या प्रणालीस डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर करुन आपली ताकद वाढवावी लागेल. तसेच यासाठी मुक्स (Moocs) चलचित्र (Animated), प्रयोगशाळा आणि वैयक्तिक माहितीचा वापर करावा लागेल जो परस्परांशी जोडलेल्या जगातून मिळविणे अपेक्षित आहे.

शिक्षणाचे प्रमुख लक्ष्य हे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, व्यावसायिक आणि बौध्दीक विकास हे असावे, ज्याअन्वये विद्यार्थी हे विधायक कामांमध्ये व्यस्त राहतील व एक आदर्शवत जीवन जगण्यास समृध्द होतील. साधारणपणे शिक्षण हे समग्र स्वरूपाचे असते व ते विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू विकासासाठी तसेच त्यांना विशिष्ट प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून नोकरी मिळवून देणारे असते. स्वयंचलित तंत्रज्ञान व आधुनिक यंत्रमानव यांच्या उदयामुळे भविष्यातील शिक्षण आणि नोकऱ्या यांचा आलेख स्पष्ट होत चाललेला आहे. पुष्कळ नोकऱ्या गमावल्या जात असतानाच कित्येक नवीन नोकऱ्या निर्माण केल्या जातील. भविष्यातील रोजगार वा नोकरीसाठी पूर्णपणे वेगळ्या धाटणीचे ज्ञान व कौशल्यांचा संच तसेच विचारसरणी, तीव्र इच्छाशक्ती व करूणा यांची आवश्यकता असेल.

**''भविष्यातील नोकऱ्यांमध्ये जे काम यंत्रमानव करू शकत नाहीत अशा गोष्टींचा समावेश असेल व जे अपयशी होतील ते बहुधा पांढरपेशी, कामगार, कनिष्ठ लेखापाल, दलाल वा अडत्या असतील'' – Michio Kaku**

भविष्यातील शिक्षण हे नवीन रोजगारांच्या वा नोकरीच्या संधी निर्माण करणारे असावे. स्वयंचलित यंत्रामध्ये होणाऱ्या वाढत्या सुधारणांमुळे, तसेच AI/ML व यंत्रमानवांमुळे असे दिसून येते की असे यंत्रमानव नजीकच्या काळामध्ये शिक्षकांची तसेच डॉक्टरांची कित्येक कामे स्वत: करू शकतील. प्रख्यात उद्योजक व गुंतवणूकदार विनोद खोसला असे भाकीत करतात की, २०३५ पर्यत यंत्रमानव हे डॉक्टरांची जागा घेतील हे भविष्य पारंपारीक शिक्षकांच्या बाबतीतही तितकेच खरे असेल. मागील वर्षीच Tsinghua विद्यापीठ व अग्रणी AI कंपनी iFlytek Ltd. यांनी तयार केलेल्या Xiaoyi नावाच्या यंत्र मानवाने चीनची राष्ट्रीय वैद्यकीय परवाना परीक्षा दिली होती. त्या परीक्षेमध्ये Xiaoyi हा नुसता पास झाला नसून त्याने सर्वात जास्त गुणांची टक्केवारी मिळविली. अलिकडील काही संशोधनातून असे दिसून येते की, यंत्रमानव हे आता अध्यापन संबंधीत विषयांमध्येही काम करू लागले आहेत व ते मानवी अध्यापनाच्या तोडीचे आहे. E ५ शिक्षण प्रणाली मध्ये सहयोगी यंत्रमानवाचे वर्चस्व दिसून येईल, आणि शिक्षक आणि विद्यार्थी एकत्रितपणे आधुनिक यंत्रमानव बनतील. सध्या सिरी, अलेक्सा, चॅटबॉट्स सारखे A I वर आधारीत व्हाईस अस्सीस्टेड डीव्हाईसेस आणि असिमा, सोफिया व आपले भारतीय बनावटीचे 'मित्र' हे मानवी यंत्रमानव कार्यरत आहेत. भविष्यातील वर्गामध्ये मानवी शिक्षकांना मदत करणारे यंत्रमानव वापरले जातील की जे त्यांची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करतील. हे आता पूर्णपणे स्पष्ट झाले आहे की, शिक्षण क्षेत्र यापुढे वास्तविक आणि विद्यमान तंत्रज्ञानाच्या प्रगतीकडे दुर्लक्ष करू शकत नाही.

**''आत्तापासून तीस वर्षानंतर बरीच मोठी विद्यापीठे नामशेष होतील. विद्यापीठे अस्तित्वात राहणार नाहीत. हा बदल मानवाला पहिल मुद्रीत पुस्तक मिळाल्यानंतर झालेल्या बदला इतका मोठा असेल'' – पीटर ड्रकर १९८८**

शैक्षणिक अराजकतेची कारणे आता स्पष्टपणे दिसू लागली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभूतपूर्व वेग मानवी क्षमतेची जागा घेवू पाहात आहे. जसे की, कारच्या साईड मिरर मध्ये पाहात असताना दूरवरची गोष्ट अधिक जवळ भासते. त्याप्रमाणे पुढील पिढीचे शिक्षण अधिक जवळ आल्याचे भासत आहे. आपण क्रांतीचे स्वागत करण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी तयार असले पाहिजे.

**शिक्षणाचा पुर्नशोध**

**''शिक्षण ही एक चळवळ आहे. जर ती आपली उद्दीष्टे पूर्ण करीत नसेल तर ती निरूपयोगी आहे. खरे शिक्षण मानवतेचे पालन करते, चैतन्याचे स्तोत्र निर्माण करते, शहाणपण देते आणि समतावादाने प्रेरीत करते'' – डॉ. बी. आर. आंबेडकर**

एकीकडे आधुनिक भारताच्या आकांक्षा उत्तुंग शिखरावर पोहचत असताना, शिक्षणापासून बदलासाठी मिळणारा प्रतिसाद मात्र अद्यापी वेगवान झालेला नाही. प्रामाणिक शिक्षकांचा समुह दिवसेंदिवस कमी होऊ लागला आहे. सद्यस्थितित शिक्षक वर्गाने त्यांच्या सुखात्मीक किंवा निद्रीत अवस्थेतून तातडीने बाहेर पडण्याची गरज आहे. या प्रक्रियेत सरकार, व्यवसाय आणि समाजाची भूमिका कधीही परस्पर पूरक असू शकत नाही. आपण हे ठामपणे ठरविले पाहिजे की, गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण केवळ श्रीमंत आणि सामर्थ्यवान मुलांसाठीच उपलब्ध होणार नाही. आपण हे ठामपणे ठरविले पाहीजे की आपल्या शिक्षणामध्ये इतरांना अंतर्भूत करण्याच्या प्रयत्नांमध्ये डिजीटल विभाजन व आर्थिक विभाजन करता कामा नये. या प्रयत्नांद्वारे आर्थिक विभाजनाव्यतीरीक्त डिजीटल भागाच्या समस्यांकडे लक्ष वेधले पाहिजे आणि ज्ञान आणि कौशल्य यांचे समाकलन करून पांढरपेशीय व कामगार वर्ग यांच्यातील दरी कमी केली पाहिजे. आपण अशी आशा करूया की, आपण टिकाऊ तत्वे आणि मानवी मूल्यांवर आधारीत गुरूकुलाच्या पार्श्वभूमिवर आधारीत भारतीय उच्च शिक्षण प्रणालीचे वर्तुळ पूर्ण करूया.

मी माझ्या भाषणाची सांगता काही मुद्दे उपस्थित करून करू इच्छितो. आपल्या काही नामांकीत विद्यापीठांच्या सद्यस्थितीबाबत मला तीव्र चिंता आहे शैक्षणिक समुदाय म्हणून आपण हा संकल्प केला पाहीजे की, विद्यापीठांना पुढील ज्ञार्नाजनाची वा शिक्षणाची मंदीरे मानली पाहीजेत, तसेच शिष्यवृत्तीला चालना देवून दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे. कोणत्याही शैक्षणिक परिसराचे रूपांतर बौध्दीक वा राजकीय कारणासाठी वापरल्या जाणाऱ्या युध्दक्षेत्रात होवू नये. विद्यार्थी प्रामुख्याने अभ्यास करण्यासाठी, करीअर घडविण्यासाठी आणि सहयोगी शिक्षणांचा अनुभव घेण्यासाठी विद्यापीठात प्रवेश घेतात. शिक्षणामुळे त्यांचे मन व जीवन घडविणे, जिज्ञासांना प्रोत्साहित करणे, मानवी मूल्यांची जोपासना करणे, सहिष्णूता जोपासणे, पर्यावरणीय संवेदनशीलता व शांतता जोपासणे इ. गोष्टी झाल्या पाहिजेत. आपण तरूण विद्यार्थ्यांना शिक्षणास अधिक गंभीरपणे घेण्यास प्रेरीत केले पाहीजे आणि त्यांना राजकारण्यांच्या हातातील कठपूतळ्या बनण्यापासून रोखले पाहिजे. शिक्षकांनी स्वत:ला आदर्श व्यक्तीमत्व म्हणून सादर केले पाहिजे आणि विद्यार्थी कोणत्याही प्रकारच्या हिंसेपासून दूर राहतील याची काळजी घेतली पाहिजे. आपण असामाजिक घटकांपासून विद्यापीठे आणि विद्यार्थ्यांचे संरक्षण केले पाहिजे आणि त्यांची उर्जा राष्ट्रनिर्मिती आणि सर्जनशीलता वाढविण्यासाठी व समाज सुसंस्कृत बनविण्यासाठी वापरली पाहिजे.

समारोप करताना, मी सर्व पदकविजेत्या आणि आज पदवी घेतलेल्या ६०,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करू इच्छितो आणि त्या सर्वांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देतो. मला आशा आहे की, आपण नेहमीच आपली मातृसंस्था, आपला देश, आपली संस्कृती, आपली परंपरा लक्षात ठेवाल आणि आपल्या जीवनातील योग्य टप्प्यावर आपल्यावर संस्कार केलेल्या समाजाची परतफेड कराल. मी, आशा करतो की, शिवाजी विद्यापीठ सर्वसामान्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावत राहील आणि ग्वाही देईल की ते सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे एक शक्तीशाली केंद्र बनेल.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!!**